# प्रेसनोट

नाशिक,
दि. २६/०८/२०२५

## खाजगी इसम शेख सुल्तान शेख अक्रम, व्यवसाय -बाउन्सर, नेम.मालेगाव पॉवर सप्लाय लिमीटेड, मालेगाव जि.नाशिक यांनी ५००००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | छावणी पोलीस स्टेशन, मालेगाव, नाशिक ग्रामिण गु.र.नं.२१३/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ (अ) प्रमाणे |
| आरोपीचे नाव,वय व कार्यालय | शेख सुल्तान शेख अक्रम, वय २८ वर्षे, व्यवसाय -बाउन्सर, नेम.मालेगाव पॉवर सप्लाय लिमीटेड, मालेगाव रा. सर्व्हे नं. ६६ घर नं. २२३, आयशा नगर, मालेगाव |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ८००००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५००००/- रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील आरोपी इसम शेख सुल्तान शेख अक्रम हे मालेगाव पॉवर सप्लाय लिमीटेड, मालेगाव येथे बाऊन्सर म्हणुन नेमणुकीस असुन तक्रारदार यांनी त्यांचे मालकीचे सर्वे नं. २६० प्लॉट नं. २२ प्लॉटला विजमीटर मिळणेकामी मालेगाव पॉवर सप्लाय लिमीटेड येथे अर्ज सादर केला होता.परंतु सर्वे नं. २६० प्लॉट नं. ३१, शॉप नं.२, देविका मल्ला, बाबा टॉवर, मालेगाव हे तक्रारदार यांचे किंवा त्यांचे कुटुंबातील कोणाचेही नावावर नसुन सदर प्लॉटचे वीज चोरीचे बील रुपये १,२६,३२४.९५/-रुपये व कम्पांउडींग बील रुपये ४०,०००/- रुपये तक्रारदार यांना भरणा करण्यास सांगीतले होते. त्यावेळी आरोपी इसम शेख सुल्तान शेख अक्रम यांनी सदर बील न भरण्याच्या बदल्यात तक्रारदार यांचेकडे ८०,०००/-रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आरोपी इसम शेख सुल्तान शेख अक्रम यांनी तक्रारदार यांचेकडे ८०,०००/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ५०,०००/-रुपयांची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दिनांक २५/०८/२०२५ रोजी मालेगाव पॉवर सप्लाय लिमीटेड, मालेगाव कार्यालयाजवळ सुरु असलेल्या बांधकामाजवळ स्विकारल्याने त्यांचेविरूध्द दि.२६.०८.२०२५ रोजी छावणी पोलीस स्टेशन, मालेगाव, नाशिक ग्रामिण गु.र.नं.२१३/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :- | ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक |
| संकेतस्थळ :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल :- | spacbnashik@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक :- | ०२५३-२५७५६२८, २५७८२३० |
| व्हॉट्स ॲपक्र :- | ९९३०९९७७०० |

स्वप्निल राजपुत
( स्वप्निल राजपुत )
पोलीस निरीक्षक, ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक